लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
कॅम्प साक्री
दि. १७/०२/२०२१

# प्रेस नोट

लोकसेवक गुलाब नथ्थु पिंजारी,वय-५५ वर्ष, प्राचार्य/मुख्याध्यापक, न्यु इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, पिंजार झाडी ता.साक्री. जि.धुळे यांनी तकारदार यांचेकडे पहिला हप्ता ३,०००/ रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा..

........................................................................................................................

तक्रारदार यांचे वडिल हे न्यु इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविदयालय, पिंजारझाडी ता.साक्री येथुन सेवानिवृत्त होत असल्याने, त्यांचा सेवानिवृत्तीनंतरचा पेंशन प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालय, धुळे येथे सादर करणेसाठी व प्रस्तावावर सहया करण्याच्या मोबदल्यात आलोसे गुलाब नथ्थु पिंजारी यांनी ८,०००/ रुपये लाचेची मागणी केली होती म्हणुन तकारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे तकार केली होती.

सदर तकारीचे अनुषंगाने आज रोजी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक गुलाब नथ्थु पिंजारी यांनी तडजोडी अंती पंच साक्षीदार यांच्या समक्ष पहिला हप्ता म्हणुन ३०००/-रुपयाची मागणी केली. त्या अनुषंगाने सापळा कारवाई केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडून आज रोजी पंचांसमक्ष ३०००/. रुपये ( पहिला हप्त) लाच स्विकारतांना त्यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर लाचेची मागणी संदर्भाची कारवाई मा.पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. निलेश सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक सुनिल कुराडे, पोनि/प्रकाश झोडगे, पोनि/मंजितसिंग चव्हाण, व त्यांच्या पथकातील पोहेकॉ/जयंत साळवे, पोना/संतोष हिरे, संदीप सरग, राजन कदम, सुधीर सोनवणे, कृष्णकांत वाडीले, कैलास जोहरे, शरद काटके, प्रकाश सोनार, पोकॉ/प्रशांत चौधरी, भुषण खलाणेकर, संदीप कदम, भुषण शेटे, सुधीर मोरे अशांनी सदरची कारवाई केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे मार्फत सामान्य जनतेस आवाहन करण्यात येते की, ज्यांच्या कडे शासकीय कामा करीता शासकीय अधिकारी/कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास त्यांनी तात्काळ खालील कमांकावर संपर्क साधावा.

**फोन नं. ०२५६२/२३४०२०**
**टोल फ्री नं. १०६४**
**भ्रमणध्वनी न ८७६६८५८६५२**
**Website : www.acbmaharashtra.gov.in**
**Mobile App. www.acbmaharashtra.net**
**Facebook Page.: www.facebook.com/MaharasthraACB.**

(सुनिल कुराडे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे